सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.**

९३, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५

ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

पुण्यश्लोक 300

जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/०२/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - ०१/०१/२०२६

# अधिसुचना

शिरवळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०३/०१/२०२६ रोजी मौजे नायगांव ता खंडाळा जि सातारा येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती मोठया प्रमाणात साजरी केली जाणार असुन सदर कार्यक्रमास मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र राज्य मुंबई, मा.एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री म.रा. मुंबई ,मा. अजितदादा पवार उपमुख्यमंत्री म रा मुंबई, इत्यादी मान्यवर तसेच प्रमुख व्यक्ती,विविध क्षेत्रातील मान्यवर,कार्यकर्ते असे मिळुन एकुण ३० ते ३५ हजार जनसमुदाय उपस्थित राहणार असुन सदर दिवशी नागरीकांची तसेच वाहनचालकांची गैरसोय होवु नये याकरीता नायगाव येथील वाहतूकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी तुषार दोशी भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये नायगाव ते केसुर्डी फाटा या मार्गावरील वाहतुक मार्गात बदल करुन वाहतुक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि. ०३/०१/२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते १४.०० वा. पर्यतची खालील अधिसुचना पारित करीत आहे.

## वाहतुक मार्गातील बदलाबाबत

## वाहतुक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. नायगाव येथुन केसुर्डी फाटा या मार्गावरील केसुर्डी फाट्याकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही बंद राहील.

२. नायगाव येथुन केसुर्डी फाटा बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही नायगाव - सांगवी - नायगाव कमान मार्गे केसुर्डी फाट्याकडे जाईल.

३. केसुर्डी फाटा येथुन नायगाव बाजुकडे जाणारी अवजड वाहतुक ही बंद राहील.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांसाठी सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक ०१/०१/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(तुषार दोशी) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - ०१/०१/२०२६

Scanned with CamScanner

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

४) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, सांगली, पुणे ग्रामीण
२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.

५) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

९) मा.जिल्हाधिकारी सातारा.

१०) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner